पाटबंधारे विकास महामंडळाच्या अधिनियमातील तरतुदीनुसार सिंचन प्रकल्पांचे व्यवस्थापन पाटबंधारे महामंडळांकडे वर्ग करणे व पाणीपट्टीची रक्कम प्रकल्पांच्या सिंचन व्यवस्थापनाच्या कामासाठी खर्च करण्यास मान्यता देणे.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्र. देवदु-२०१५/(८३६/२०१५)/ सिंव्य (कामे),
मंत्रालय,मुंबई-४०००३२
दिनांक : ०३/०९/२०१९

<u>संदर्भ</u> :- १) शासन निर्णय क्र. संकीर्ण- २००४/(२०२/२००४)/ जसंनि, दि.२८.०६.२००४
२) शासन निर्णय क्र. देवदु २०१५/(८३६/२०१५)/ सिंव्य (कामे),दि.१७.११.२०१६
३) गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाचे पत्र क्र. गोपाविमं/लेखा-२/ ३३/६३, दि. १८/४/२०१८
४) विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचे पत्र क्र. ८०९२/विपाविम/लेखा-४/सिंव्य (कामे)/२०१८, दि. ९/८/२०१८
५) तापी पाटबंधारे विकास महामंडळाचे पत्र क्र. कास/तापाविमं/लेखा-१/४४००/ सन २०१८, दि. ६/८/२०१८ व दि.१४.९.२०१८ रोजी ई-मेलद्वारे प्राप्त प्रपत्रे
६) महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचे पत्र क्र.मकृखोविम /३७/ (७२६/२०१७)/ सिंव्य-२/३९८३, दि. १३/८/२०१८ व पत्र क्र.४५७९,दि.२१.९.२०१८
७) कोकण पाटबंधारे विकास महामंडळाचे पत्र क्र.कोपाविम /लेखा-४/३२५०/२०१८ दि.२६/०९/२०१८ व दि. १७/०७/२०१९ रोजी ईमेल व्दारे प्राप्त सुधारीत प्रपत्रे.
८) जलसंपदा विभाग पत्र क्र. बैठक २०१८/प्र.क्र.१८०/निवसं-१,दि. २८/८/२०१८ (मा.मुख्यमंत्री महोदयाच्या अध्यक्षतेखाली दि.२२/६/२०१८ रोजी आयोजित बैठकीचे इतिवृत्त)

<u>पार्श्वभूमी</u> :-

राज्यातील विदर्भ,तापी,गोदावरी, कोकण व कृष्णा या पाटबंधारे विकास महामंडळांच्या अधिनियमातील तरतूदीनुसार उपरोक्त संदर्भ क्र.२ मधील शासन निर्णयान्वये सिंचन व्यवस्थापन महामंडळांकडे वर्ग करुन पाणीपट्टीची रक्कम प्रकल्पांच्या सिंचन व्यवस्थापन कामासाठी खर्च करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्या अनुषंगाने संदर्भ क्र.२ मधील शासन निर्णयाच्या अंमलबजावणीस सर्व महामंडळांच्या स्तरावर सुरुवात करण्यात आली आहे.

उपरोक्त संदर्भ क्र.२ मधील शासन निर्णयातील परिच्छेद क्र.८ नुसार पाटबंधारे विकास महामंडळांतर्गत सिंचन व्यवस्थापन आस्थापना खर्चासाठी आवश्यक अनुदान प्रचलित पध्दतीने शासन स्तरावरुन देण्यात येईल व त्याचा परतावा महामंडळांनी त्यांना पाणीपट्टीमधून शासन निर्णय परि.क्र.२ व ३मधील सुत्रानुसार उपलब्ध होणा-या निधीतून सन २०१६-१७ मध्ये २०% सन २०१७-१८ मध्ये ४०%, सन २०१८-१९ मध्ये ६०% , सन २०१९-२० मध्ये ८०% व सन २०२०-२१ मध्ये १००% अशा टप्प्याने शासनास अदा करावा असे निर्देश देण्यात आले आहेत. तथापि सन २०१६-१७ व २०१७-१८ मध्ये महामंडळांनी शासनास अदा केलेला आस्थापना खर्चाचा परतावा

हा अनुज्ञेय अनुक्रमे २०% व ४०% परताव्यापेक्षा बराच कमी आहे. तसेच अनुज्ञेय आस्थापना खर्चाच्या परताव्यामुळे सिंचन व्यवस्थापनाच्या दृष्टीने आवश्यक देखभाल दुरुस्ती खर्च , शासकीय उपसा सिंचन योजनांची दुरुस्ती व वीजदेयके, व्यवस्थापनाचा कार्यालयीन खर्च, पाणी वापर संस्थांचे परतावे व इतर सर्व खर्च करण्यास अडचणी येत असल्याचे व त्यामुळे प्रकल्पांच्या देखभाल दुरुस्तीवर व सिंचन व्यवस्थापनावर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता सर्व महामंडळांनी वर्तवली आहे.

तसेच उपरोक्त संदर्भ क्र.२ मधील शासन निर्णयातील परि.क्र.८ पूर्णपणे वगळण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधींनी देखील विविध स्तरावर मांडलेली आहे. तसेच दिनांक २२/०६/२०१८ व दि.२२/०७/२०१९ रोजी मा.मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली संपन्न बैठकीत देखील याबाबत चर्चा झालेली आहे. व सदर चर्चेनुसार सन २०१८-१९ या आर्थिक वर्षापासून महामंडळाद्वारे पाणीपट्टी वसूलीतून शासनास देय होणारा आस्थापना खर्चाचा परतावा कमी करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती .तद्नंतर मा.मंत्रिमंडळाच्या दि.२०/०८/२०१९ रोजीच्या बैठकीत मा.मंत्रिमंडळाच्या दि.०८/११/२०१६ रोजीच्या बैठकीतील निर्णयाचा पुनर्विचार करून त्यानुसार यापूर्वी निर्गमित केलेल्या जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्र.देवदु-२०१५/(८३६/२०१५)/सिंव्य(कामे), दि.१७/११/२०१६ मध्ये आवश्यक सुधारणा करणेस मा.मंत्रिमंडळाने मान्यता दिलेली आहे. त्याअनुषंगाने उपरोक्त संदर्भ क्र.२ मधील शासन निर्णयात खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

<u>शासन निर्णय</u> :-

शासन निर्णय क्र. देवदु २०१५/(८३६/२०१५)/ सिंव्य (कामे),दि.१७.११.२०१६ मधील परिच्छेद क्र.८.० मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

अ.क्र.	शासन निर्णय दि.१७.११.२०१६ मधील तरतूद.	प्रस्तावित सुधारणा
१	पाटबंधारे विकास महामंडळांतर्गत सिंचन व्यवस्थापन आस्थापना खर्चासाठी आवश्यक अनुदान प्रचलित पध्दतीने शासन स्तरावरुन देण्यात येईल. त्याचा परतावा महामंडळांनी त्यांना पाणीपट्टीमधून परिच्छेद क्र. २ व ३ मधील सुत्रानुसार उपलब्ध होणाऱ्या निधीतून सन २०१६-१७ मध्ये २०%, सन २०१७-१८ मध्ये ४०% व सन २०१८-१९ मध्ये ६०%, सन २०१९-२० मध्ये ८० % व सन २०२०-२१ पासून पुढे १०० % अशा टप्प्याने शासनास अदा करावा.	सन २०१८-१९ वर्षापासून पाटबंधारे विकास महामंडळाअंतर्गत सिंचन व्यवस्थापन आस्थापना खर्चासाठी आवश्यक अनुदान प्रचलित पध्दतीने शासन स्तरावरुन देण्यात येईल. त्याचा परतावा महामंडळानी पाणी पट्टीमधून शासन निर्णय दि.१७/११/१६ च्या परिच्छेद क्र. २ व ३ मधील सुत्रानुसार उपलब्ध होणाऱ्या निधीतून सन २०१७-१८ पासून दरवर्षी २५% प्रमाणे शासनास अदा करावा.
२	नव्याने अंतर्भूत करावयाची तरतूद	प्रत्येक महामंडळानी त्यांच्या अखत्यारितील उपसा सिंचन योजनांच्या वीज देयकातील ८१% वाटा प्राप्त होणाऱ्या बिगर सिंचन पाणीपट्टीतून भागवावा व उर्वरित बिगर सिंचन पाणीपट्टीच्या रक्कमेची विभागणी शासन निर्णय दि.१७/११/२०१६ मधील परिच्छेद क्र. २ नुसार करावी.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१-अ/२०१८/व्यय-१२, दि.०५/०२/२०१९ व नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.११३/१४३३, दि.२१/१२/२०१८ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०९०३१६२६१६८०२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Atul Ashok Kapole

Digitally signed by Atul Ashok Kapole
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=797fcfe0bb4a86dd814129f50d05c1d249ea6f0acc364c6214f11ff7174bd5ef,
serialNumber=ae2c4f4c985d3e984de94324901263d48766ec651dea49d652faf11a96aa98b5, cn=Atul Ashok Kapole
Date: 2019.09.03 16:34:02 +05'30'

(अ.अ.कपोले)
शासनाचे उप सचिव

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव
३. मा.अध्यक्ष/उपाध्यक्ष,विधानसभा,विधानभवन,मुंबई
४. मा.अध्यक्ष/उपाध्यक्ष,विधानपरिषद,विधानभवन,मुंबई
५. मा.विरोधी पक्षनेते,विधानसभा,मुंबई योच कार्यालय,विधानभवन,मुंबई
६. सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव
७. सर्व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
८. महालेखापाल) २/१लेखा व अनुज्ञेयता)महाराष्ट्र राज्य,मुंबई/नागपूर
९. महालेखापाल) २/१लेखा परिक्षा (महाराष्ट्र राज्य,मुंबई/नागपूर
१०.प्रधान सचिव, वित्त विभाग/नियोजन विभाग/ग्राम विकास व जलसंधारण विभाग
११.स्वीय सहायक,प्रधान सचिव,(जसंप्र व वि)जलसंपदा विभाग,मंत्रालय,मुंबई
१२.स्वीय सहायक,सचिव, (जसंव्य व लाक्षेवि),जलसंपदा विभाग,मंत्रालय,मुंबई
१३.सर्व कार्यकारी संचालक,जलसंपदा विभाग
१४.मुख्य अभियंता(पा)व सह सचिव,जलसंपदा विभाग,मंत्रालय,मुंबई
१५.सर्व मुख्य अभियंते,जलसंपदा विभाग
१६.उप सचिव(सिंव्य),जलसंपदा विभाग,मंत्रालय,मुंबई
१७.सर्व अधीक्षक अभियंते,जलसंपदा विभाग
१८. सर्व कार्यकारी अभियंते,जलसंपदा विभाग
१९.सर्व तांत्रिक कार्यासन,जलसंपदा विभाग
२०.संचालक,माहिती व जनसंपर्क संचालनालय,मंत्रालय,मुंबई
२१.सिंव्य कामे/ संग्रहार्थ